दिनांक 13/04/2023 (गुरूवार) सायंकाळ

---

## अंमली पदार्थाची विक्री करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

## पोलीस स्टेशन खापरखेडा यांची कारवाई

दिनांक १२/०४/२०२३ रोजी पोलीस स्टेशन खापरखेडा येथील गुन्हे प्रगटीकरण पथकाचे अंमलदार पोलीस हवालदार उमेश ठाकरे यांना गुप्त बातमीदारांमार्फत खबर मिळाली की, आशिष रामटेके नावाचा इसम पोस्टे खापरखेडा हद्दीतील नांदा पुलाजवळ एम. डी. ड्रग्स पावडर नावाचा अंमली पदार्थ घेवुन विक्री करीता येणार असल्याची खात्रीशीर बातमी प्राप्त झाल्याने सदर खबरेबाबत वरीष्ठांना माहिती देवुन मिळालेल्या खबरीतील वर्णनास मिळते जुळते वर्णन असलेला इसम आपली काळया रंगाची ॲक्टीव्हा गाडीने नांदा पुलाजवळील दादाजी धुनिवाले महाराज मंदीरासमोर येवुन थांबल्याने सापळयातील अंमलदार यांनी त्याचा घेराव करून त्यास ताब्यात घेवुन त्यास त्याचे नाव गाव विचारले असता त्याने आपले नाव **आशिष सागर रामटेके, वय ३३ वर्ष, रा. सन्याल नगर, नारी रोड टेका नाका नागपूर** असे सांगितले. पंचा समक्ष ताब्यात घेतलेल्या आरोपीची अंगझडती घेतली असता त्याने घातलेल्या जिन्स पॅन्ट चे डाव्या खिशात एक प्लास्टिकची प्रेसलॉक पन्नीमध्ये पांढऱ्या रंगाची पावडर दिसुन आली. नमुद इसम नामे– आशिष सागर रामटेके वय ३३ वर्ष, रा. सन्याल नगर, नारी रोड टेका नाका नागपूर याचे ताब्यातुन ०८ ग्रॅम १० मिली ग्रॅम मेफेड्रोन ड्रग पावडर किंमती ८१,०००/–रू. व एक आकाशी रंगाचा vivo कंपनीचा मोबाईल हॅन्डसेट किमती अंदाजे १०,०००/–रू. व होंडा ॲक्टीवा मोपेड गाडी नं. एम.एच–४९/बी.पी–७००२ असलेली किंमती अंदाजे ५०,०००/–रू. असा एकुण १,४१,०००/–रू. चा मुद्देमाल मिळुन आल्याने त्याचे हे कृत्य कलम ८ (क), २१ (ब), एन. डी. पी. एस. ॲक्ट प्रमाणे होत असल्याने पोस्टेला अप क्र. १६०/२०२३ कलम ८ (क), २१(ब) एन.डी. पी. एस. अन्वये गुन्हा नोंद करून तपासात आहे.

सदरची कामगिरी ही पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. विशाल आनंद सा., अपर पोलीस अधिक्षक नागपूर ग्रामीण श्री. डॉ. संदिप पखाले, सहायक पोलीस अधिक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी रामटेक तथा अति. कार्यभार कामठी विभाग श्री. आशित कांबळे, पोलीस निरीक्षक पोस्टे खापरखेडा श्री. प्रविण मुंडे, सहायक पोलीस निरीक्षक दिपक कॉक्रेटवार, पोलीस हवालदार उमेश ठाकरे, आशिष भुरे, दिलीप पटले, शैलेष यादव, पोलीस नायक प्रमोद भोयर, राजू भोयर, मुकेश वाघाडे यांनी पार पाडली.

## जबरी चोरी

**पो.स्टे. सावनेर** :– अंतर्गत ०२ कि. मी. अंतरावरील सावनेर बायपास ओये हाटेल जवळ सावनेर येथे फिर्यादी नामे– आयुब कुदरत खान, वय ५३ वर्ष, रा. मोतीलाल नगर करोट जेल भोपाल हा आपले ताब्यातील आयसर ट्रक क्र. एम एच–४० सी. एम.– ०५१९ गाडी मध्ये ९ म्हशी जनावरे घेवुन जात असता यातील अज्ञात ०३ आरोपीतांनी फिर्यादीची आयसर गाडी रस्त्यात अडवुन ठाण्यात चल अशी धमकी देवुन आयसर गाडी किंमती अंदाजे ८०००००/–रू. व गाडी मधील ९ म्हशी किंमती अंदाजे १८००००/–रू. व फिर्यादीचे सॅमसंग कंपनीचा कीपॅड मोबाईल ५००/–रू. असा एकुण ९८०५००/– रूपयाचा मुद्देमाल बळजबळीने लुटुन पळुन नेले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. सावनेर येथे आरोपीतांविरुध्द कलम ३४१, ३९२ भादंवी अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि नागवे मो. नं. ९८२३४०३५६५ हे करीत आहे.

## चोरी

**पो.स्टे. काटोल** :– अंतर्गत १५ कि. मी. अंतरावरील परसोडी शिवार सिर्सावाडी शिवार नायगाव चिंचाळा येथे दिनांक दि. १२/०४/२०२३ चे १०.३० वा. पुर्वी फिर्यादी नामे– मंगेश विलासराव शेगावकर, वय ४४ वर्ष, रा. नागपुर हल्ली मुक्काम काटोल म. रा. वि. वि. कंपनी कनिष्ठ अभियंता याला परसोडी येथील लाईनमेन याने फोन करून सांगितले की परसोडी डि. पी. वरील लघुदाब वाहिनीचा एक वायर चार गाळयामधील एल्युमीनीयम वायर २४० मीटर किंमती अंदाजे ५८००/– रूपयाचा मुद्देमाल तसेच सिर्सावाडी शिवारातील वायर तीन गाळयामधील एल्युमीनीयम वायर १८० मीटर किंमती अंदाजे ४४००/– रूपयांचा मुद्देमाल तसेच नायगांव चिंचाळा शिवारातील शेतातील ट्रान्स फॉर्मर डी. पी. चे ऑईल १५५ लिटर किंमती अंदाजे ९३००/– रूपयांचा मुद्देमाल असा एकुण १९५००/– रूपयाचा मुद्देमाल कोणीतरी अज्ञात आरोपीने चोरून नेला आहे.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३७९ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास पोलीस नायक आशीभा हिरूडकर मो. नं. ९३५९३९११८६ हे करीत आहे.

<u>**विनयभंग**</u>

<u>पो.स्टे. कन्हान</u> **:–** दिनांक ११/०४/२०२३ चे २३/०० वा. दरम्यान फिर्यादी/पीडिता वय २४ वर्ष हिचे लग्न १ मे २०२३ मध्ये असल्याने **आरोपी नामे– गोपाल रामेश्वर गोंडाणे, रा. विवेकानंद नगर कन्हान** याने फिर्यादी सोबत रेप केल्याने फिर्यादी हिने पोलीस स्टेशन कन्हानला त्याचे विरूद्ध अप क्रमांक ३४३/२२ कलम ३७६, ५०४ भादंवी नुसार गुन्हा नोंद केला होता. आरोपी हा सध्या हा जामीनवर बाहेर आला आहे. अंदाजे १५ ते २० दिवसापुर्वी **आरोपीची पत्नी नामे– सिमा गोपाल गोंडाने दोन्ही रा. विवेकानंद नगर कन्हान** हीने फिर्यादीच्या घरी जावुन म्हटले की, ''माझ्या नवऱ्या विरूद्ध दिलेली रिपोर्ट परत घे तुमच्या मुलीचे लग्न आज न उदया जुडणार आहे तरी तुम्ही कॉम्परोमाईस करून घ्या'' फिर्यादी हिने नाही म्हटले असता आरोपी ही तेथून निघून गेली. यातील फिर्यादी हिचे कडे स्मार्ट फोनवर shital .pothbhare . instagram ही आयडी तयार केली असून त्याच आयडीवरून इन्स्टाग्राम वापरते दि ०५/०४/२०२३ पासून फिर्यादी हिच्या आयडीवर Priya.saratkar-345. instagram वरून फिर्यादी हिला वाढदिवसाचे मॅसेज आले परंतु फिर्यादी ही सदर आयडी धारकाला ओळखत नसल्याने मॅसेजचे रिप्लाय दिले नाही यापुर्वी सुध्दा आरोपी गोपाल गोंडाणे हा फिर्यादी हिच्या आयडी वर लक्ष ठेवायचा दि. ११/०४/२०२३ रोजी दुपारी १२/०० वा. अजय पोटभरे यांनी फिर्यादी हिला फोन करून सांगीतले की, ajay.pothbhare.50 या इंस्टाग्राम आयडीवर गोपाल गोडाणे याने Priya.saratkar-345. . instagram या आयडी वरून मॅसेज केला आहे की, ''तुम्ही शितल चकोले सोबत जोडलेले लग्न तोडून टाका नाही तर शितलचे फोटो व व्हीडीओ व्हायरल करून टाकीन'' असे सांगीतले दुपारी १२/१५ वा. परत फिर्यादीला अजय यांनी फोन करून सांगीतले की, गोपाल गोंडाने याने Priya.saratkar-345. . instagram या आयडी वरून फिर्यादी हिचे सोबत गोपाल गोडाणे यांची एकत्र असलेली एकुण २४ फोटो इन्स्टाग्राम वर पोस्ट केली आहे. आरोपीचे कृत्य हे फिर्यादीस लज्जास्पद वाटले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांचे रिपोर्टवरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३५४ डी ५०१, ५०६, ३४ भा.द.वि. कायद्यान्वये अन्वये गुन्हा नोंद करण्यात आलेला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोनी मकेश्वर पोस्टे कन्हान मो. नं. ९०४९९६५०१४ हे करीत आहे.

**पोलीस माहिती कक्ष**

**नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर**